महाराष्ट्र शासन
गृह विभाग
दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२

Email ID- pol4.home@maharashtra.gov.in

---

**क्रमांक :एमटीएस-०३१९/प्र.क्र.२४५/पोल-४,** **दिनांक : २३ सप्टेंबर, २०२२**

प्रति,
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय चर्नी रोड,
मुंबई.

**विषय :-** सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक, (सेवाप्रवेश) नियम,२०१९ शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक, (सेवाप्रवेश) नियम,२०१९ मध्ये सुधारणा करण्यासंबंधी शासन अधिसूचनेची इंग्रजी व मराठी प्रत (दोन प्रतींमध्ये) सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर सुधारणा महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ (ब) मध्ये आज दिनांक २३.०९.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात यावी. व त्याच्या प्रत्येकी मराठी व इंग्रजीच्या १०० प्रती शासनास व पोलीस महासंचालक कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात याव्या, ही विनंती.

( शिरीष मोहोड )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रमुख मुद्रितशोधक (अ) करिता
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नीरोड, मुंबई ४०० ००४

F:\DO Gosavi Sir\Letter.docx

# NOTIFICATION

Home Department,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Dated the 23rd September 2022.

Maharashtra Police Act.

No. MTS-0319/CR-245/Pol-4. - In exercise of the powers conferred by Clause *(b)* of Section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, namely :-

1. These rules may be called the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) (Third Amendment) Rules, 2022.
2. For Rule 8 (A) of the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, the following rule shall be substituted, namely :-

**8.** (A): Candidates securing a minimum of 50 % marks in physical test shall be eligible to be called to appear for a written test of 100 marks in the ratio of 1:10 of vacancies advertised in the respective categories.

**Explanation** : For example, if there are 10 vacancies in the Scheduled Caste category and 5 vacancies in the Scheduled Tribes category, then 100 (10 X 10 = 100) candidates will be listed on merit in the Scheduled Caste category and 50 (5 X 10 = 50) candidates will be listed in the Scheduled Tribes category.

However, all the candidates in the Scheduled Caste category who have secured the same marks as the Scheduled Caste category candidate at the 100th

rank shall be eligible to be called to appear for a written test. Similarly, all Scheduled Tribes category candidates who have secured the same marks as Scheduled Tribes category candidate at the $50^{th}$ rank will be eligible to be called to appear for a written test.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

( Shirish Mohod )
Deputy Secretary to the Government

# अधिसूचना

गृह विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दि. २३ सप्टेंबर २०२२

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

क्रमांक एमटीएस-०३१९/प्र.क्र.२४५/पोल-४, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सन १९५१ चा २२) याच्या कलम ५ च्या खंड (ख) व्दारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा, वापर करुन महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :-

१. या नियमास, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) (तृतीय सुधारणा) नियम, २०२२ असे म्हणावे. सदर नियम शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ याच्या नियम ८ (अ) या ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येतील :-

८ (अ) : शारीरिक चाचणीत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त जागांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी परीक्षेसाठी बोलावण्यास पात्र असतील.

**स्पष्टीकरण :** उदाहरणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गात १० रिक्त जागा आणि अनुसुचित जमाती प्रवर्गात ५ रिक्त जागा असतील, तर अनुसूचित प्रवर्गातील १०० (१०X१०=१००) उमेदवारांना गुणवत्तेनुसार सूचीबध्द करण्यात येईल आणि अनुसुचित जमाती प्रवर्गातील ५० (५x१०=५०) उमेदवारांना सूचीबध्द करण्यात येईल.

तथापि, गुणानुक्रमांक १०० वर असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवार म्हणून अनुसूचित जाती प्रवर्गातील ज्या उमेदवारांना सारखेच गुणे मिळालेले आहेत असे सर्व उमेदवार, लेखी चाचणीला बसण्यासाठी बोलावण्यास पात्र असतील. त्याचप्रमाणे गुणानुक्रमांक ५० असलेल्या अनुसूचित जमातीतील ज्या उमेदवारांना ५० गुणानुक्रमांक असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार म्हणून सारखेच गुण मिळालेले आहेत असे सर्व उमेदवार, लेखी चाचणीला बसण्याकरीता बोलावण्यास पात्र असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( शिरीष मोहोड )
शासनाचे उप सचिव

F:\DO Gosavi Sir\RR\Police Constable Driver Corrigendum Proportionate change.docx